# <u>जिल्हा व सत्र न्यायालय, जालना</u>

## निविदा / दरपत्रक

जिल्हा व सत्र न्यायालय, जालना या करिता जे. के./ईकोराईज कॉपीअर **<u>75 GSM, A-4 Size</u>** झेरॉक्स पेपर 300 रीम खरेदी करण्यासाठी निविदा/दरपत्रक मागवित आहे.

उपरोक्त झेरॉक्स पेपर रीम खरेदी करण्यासाठी सदरील पुरवठादाराने आपले दरपत्रक सोबत दिलेल्या "नियम व अटींच्या" अधिन राहून या कार्यालयाच्या खालील पत्त्यावर सीलबंद पाकिटावर **प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, जालना** यांचे नावे दिनांक 11/03/2025 रोजी सायंकाळी 05:30 वाजेपर्यंत मिळतील, अशा बेताने पाठविण्याची व्यवस्था करावी. यानंतर प्राप्त झालेले दरपत्रक (निविदा) ग्राहय धरण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

आदेशान्वये

**प्रबंधक**
जिल्हा व सत्र न्यायालय
जालना

दिनांक : 27/02/2025.

E:\rbs2022\QuatationXR0225.odt

# जिल्हा व सत्र न्यायालय, जालना.

## जे.के. कॉपीअर 75 GSM, A-4 Size झेरॉक्स रीम 300 नग दरपत्रकासाठी खालील नियम, शर्ती व अटी लागू राहतील.

01) प्रत्येक निविदाकारास फक्त एकच दरपत्रक देण्याची परवानगी असेल, याची नोंद घ्यावी. सदरील दरपत्रक फक्त J.K./ECORISE EASY COPIER कंपनीचे व **75 जीएसएम ए–4** साईज रीमचे देण्यात यावे.

02) या कार्यालयाचे गरजांची पूर्तता करण्यात येणारे व सर्वात कमी किंमतीचे दरपत्रक मंजुर करण्यात येतील.

03) निविदाकाराला अधिकृत पुरवठादार/एजन्सी लेटर हेडवर दरपत्रक सादर करणे व त्यावर जीएसटी क्रमांक नमुद करणे बंधनकारक राहील.

04) दरपत्रकामध्ये सर्व प्रकारच्या करांसह, इतर चार्जस् वगैर, यांचा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे.

05) दरपत्रक सादर करणा–या निविदाकरांचा खरेदी कार्यालयाबरोबर कोणताही हितसंबंध नसावा, याची नोंद घ्यावी.

06) दरपत्रके सादर करतांना त्यामध्ये संदर्भीय पत्राचा उल्लेख करणे बंधनकारक राहील. सदरील सिलबंद दरपत्रक हे दिनांक 11/03/2025 रोजी सायंकाळी 05:30 वाजेपर्यंत या कार्यालयात स्विकारण्यात येतील. त्यानंतर प्राप्त होणारी दरपत्रके विचारात घेतली जाणार नाही, यांची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

07) सदरील दरपत्रके पाठवितांना ती **"मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश," जालना** यांचे नांवे पाठविण्यात यावी, तसेच पाकिटावर **"झेरॉक्स रिमसाठी दरपत्रक"** असा उल्लेख करावा.

08) सदरील दरपत्रके ही सिलबंद पाकिटात टाकून पाकिटावर **प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, जालना** या पत्त्यावर पाठविण्यांत यावी.

09) सिलबंद दरपत्रके हे जिल्हा न्यायालय "त्रिसदस्यीय वस्तू खरेदी सल्लागार समिती" यांचे समक्ष जिल्हा न्यायाधीश–1, जालना यांचे निजीकक्षात दिनांक 12/03/2025 रोजी उघडण्यात येतील. जर तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास दुस-या दिवशी किंवा नियोजीत वेळेत व ठिकाणी समितीपुढे उघडण्यात येतील.

10) उपरोक्त झेरॉक्स रीम या जिल्हा व सत्र न्यायालय, जालना येथे या न्यायालयाने ऑर्डर दिल्यानंतर तीन ते चार दिवसांच्या आत सुस्थितीत स्वखर्चाने आणून देण्याची जबाबदारी संबंधीत पुरवठादार/संस्थेची राहिल, यांची नोंद घ्यावी.

11) सदरील दरपत्रके स्विकारण्याचा व नाकारण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जालना राखून ठेवत आहे.

27/2

प्रबंधक
जिल्हा व सत्र न्यायालय,
जालना.

E:\rbs2022\QuatationXR0225.odt